# SARASWATI
## The Research Journal

Special Issue
Global and Internal Politics: Issues and Areas

**SBES College of Arts and Commerce,
Aurangabad, Maharashtra**

Special Issue (1) 2020-21, ISSN 2229 - 5224

# अनुक्रमणिका


| अ.क. | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| 1. | संपादकीय | | viii |
| 2. | ग्रामीण विकासात स्थानिक स्वशासनाची भूमिका | भाग्यश्री दौड | 01 |
| 3. | केंद्र-राज्य संबंध | डॉ.कादरी सय्यद मुजतबा | 06 |
| 4. | निवडणुक आयोगाची भूमिका | उज़मा ऐनोद्दीन सिद्दीकी | 08 |
| 5. | केंद्र आणि राज्यसंबंध | कैलास अवसरमोल | 12 |
| 6. | केंद्र- राज्य संबंध व तणाव निर्माण करणारे घटक | डॉ.सुनिल पिंपळे | 17 |
| 7. | कलम ३७० व ३५ (A) आणि भारतीय राजकारण | प्रा.मुंडे एस.एम. | 21 |
| 8. | भारतीय राज्यघटनेतील न्यायालयीन सक्रियतेचे योगदान | डॉ.अण्णासाहेब हरदारे | 24 |
| 9. | केंद्र-राज्य संबंधाचे बदलते स्वरूप | डॉ.अतुल खोसे | 30 |
| 10. | कलम ३७० व ३५ अ निर्मुलन | डॉ.रामकिशन लोमटे | 34 |
| 11. | भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेत राज्यपालाची भूमिका | दळवे बालाजी | 38 |
| 12. | कोरोना काळात महिलांवरील अत्याचार: उपाययोजना | डॉ.विश्वनाथ आवड | 41 |
| 13. | केंद्र-राज्य संबंधातील वाढता तणाव | डॉ.रमाकांत तिडके | 46 |
| 14. | Abolition of 370 & 35A | आबासाहेब हर्षे | 51 |
| 15. | लोकशाही शासन : आघाडी शासनाची अपरिहार्यता | डॉ.राजू वनारसे<br>डॉ.सत्यपाल कांबळे | 59 |
| 16. | केंद्र-राज्य संबंध:एक समीक्षात्मक अभ्यास | डॉ.विनोद आचार्य | 64 |
| 17. | एक भारत श्रेष्ठ भारत | डॉ.माधव चोले | 68 |
| 18. | राज्यपालांची भूमिका | परवीन यादव | 74 |
| 19. | महाराष्ट्रातील बदलते राजकारण | बाळासाहेब नलावडे | 80 |
| 20. | कोविड-१९ : मिडिया आणि राजकारण | प्रा.हिवाळे लक्ष्मण | 83 |
| 21. | राज्यपालाची भूमिका | प्रा.भिमराव खरात | 87 |
| 22. | कलम 370 आणि 35 अ | डॉ.एन.बी.आघाव | 90 |
| 23. | केंद्र-राज्य संबंधाचे बदलते आयाम | डॉ.माधव कदम | 93 |
| 24. | राज्यपाल : घटनात्मक अपेक्षा आणि वास्तव | डॉ.माधव कदम | 97 |

# भारतीय राज्यघटनेतील न्यायालयीन सक्रियतेचे योगदान

**डॉ. अण्णासाहेब हरदारे**

**प्रस्तावना :**

प्रत्येक राजकीय व्यवस्थित शासनाची तीन प्रमुख अंगे असतात. कार्यकारीमंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ या प्रमुखांना अंगांचा समावेश त्यामध्ये होतो. ही तीन अंगे कार्याच्या आधारावर विभाजित करून कायद्यांची निर्मिती करण्यासाठी कायदेमंडळ ,कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी मंडळ, आणि कायद्याचा अर्थ लावण्याचे, कायद्याच्या अर्थासंबंधी केंद्रशासन,नागरिक आणि आंतरराष्ट्रीय संस्था आणि विषय यांच्या मधील वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय देण्याची शाखा म्हणजे न्यायमंडळ होय . न्यायालयीन सक्रियता संकल्पना हि या तीन्ही शासनाच्या अंगामध्ये नियंत्रण नियंत्रण ठेवते. म्हणून राजकीय व्यवस्थेत न्यायालयाच्या 'न्यायालयीन सक्रियता'ला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वसाधारण न्यायालयात येणारे खटले हे बाधित व्यक्तीने स्वतः केलेल्या तक्रारीच्या किंवा याचिकेच्या स्वरूपात दाखल होतात. परंतु गेल्या काही दशकांमध्ये न्यायालयाच्या कार्यपद्धती बदल झालेला दिसून येतो. म्हणजेच न्यायव्यवस्थेने आपली व्याप्ती वाढवले आहे .त्याला भारतीय न्यायव्यवस्था देखील अपवाद नाही. न्यायालयाने सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयात कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही विषयाबाबत न्यायासाठी याचिका दाखल करण्याचा दिलेला अधिकार म्हणजेच न्यायालयीन सक्रियता होय. एखादा विषय प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निगडित असलेली व्यक्ती किंवा संस्था बाधित यांच्यावतीने अर्ज करू शकते ,अशा अर्जांना किंवा याचिकांना जनहित याचिका म्हणतात. तसेच काही वेळा न्यायालयाने कोणतीही तक्रार नसताना अथवा याचिका दाखल नसताना स्वतः न्यायालय सार्वजनिक विषयाची दखल घेऊन दावा दाखल करते व न्याय किंवा आदेश दिला जातो. या न्यायालयाने घेतलेल्या पुढाकाराला न्यायालयीन सक्रियता असे म्हणतात.

**संशोधनाचीउद्दिष्टे** : सदर शोधनिबंध लिहताना पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहेत .

1.राजकीय व्यवस्थांच्या अंगांचा अभ्यास करणे.

2. न्यायालयाची रचना व कार्य अभ्यासणे.

3. न्यायालयीन सक्रियता म्हणजे काय अभ्यासणे.

4. न्यायालयीन सक्रियताचे भारतीय राज्यघटनेतील योगदान अभ्यासणे.

5. न्यायालयीन सक्रियता त्याचे मूल्यमापन करणे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोधनिबंधासाठी संशोधनाच्या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये न्यायालयीन सक्रियता व तिच्या संदर्भातील संदर्भग्रंथ, पुस्तके मासिके, आणि न्यायालय निर्णयसंदर्भात वृत्तपत्रे यांचा आधार घेऊन संशोधन पेपर पूर्ण केला आहे.



PRINCIPAL
Shivaraj College of Arts, Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)

141

**विषय विवेचन :**

भारतात एकेरी न्यायव्यवस्था अस्तित्वात आहे. स्थानिक पातळीवरील पंचायत कोर्टापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत न्यायमंडळाचे विशिष्ट असे संस्थात्मक रचना भारतात आहे. कोणाला कोणत्या ही पातळीवर न्यायालयात अपील करता येते. न्यायमंडळाचे काम सर्वसाधारणपणे घटना घडून गेल्या नंतर सुरू होते .म्हणजेच एखाद्या घटनेशी संबंधित कोणत्याही एकापक्षाने आपली अपील केल्याशिवाय न्यायालय हस्तक्षेप करत नाही. पण गेल्या दशकात म्हणजे 1980 नंतर न्यायालय सामान्य प्रश्नाबाबत सक्रिय झाल्याची दिसतात. आज न्यायालय विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक घडामोडीवर आपल्या निर्णयाद्वारे प्रभाव टाकताना दिसतात. हा निर्णय स्वतः न्यायालय कोणत्याही स्वरुपाची फिर्याद किंवा तक्रार नसताना देताना दिसत आहेत. सार्वजनिक कल्याण, नागरिकांचे मूलभूत हक्क, राज्यघटनेचे संरक्षण, पर्यावरण संरक्षण . आणि सार्वजनिक आरोग्य इत्यादी, दृष्टिकोनात सध्या न्यायालय जनहित याचिका किंवा स्वतःच्या सद्विवेकबुद्धीच्या कसोटीवर न्याय देताना दिसत आहे. अशा प्रकारच्या खटल्यामुळे न्यायालयाने महत्त्वाची भूमिका बजावताना संविधानाचे महत्त्व अधोरेखित करून देशाचा सर्व श्रेष्ठ कायदा म्हणजेच' संविधान' असा निकाल दिला आहे. थोडक्यात 1950 पासून ते आज पर्यंत वेगवेगळ्या वेगवेगळ्या खटल्यांच्या माध्यमातून भारतीय संविधानाची सर्वोच्चता स्पष्ट केली आहेत सेचनागरिकांचे मूलभूत हक्क सुरक्षित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. उदाहरणार्थ 1950 चा गोपालन खटला, 1970 चाकेशवानंद भारती खटला, 1980 चामिलन व 33 मिलखटला शहाबानो खटला इत्यादी यांच्या माध्यमातून न्यायालयाने सक्रिय भूमिका बजावलेली आहे. थोडक्यात राज्यघटनेचे संरक्षण, राज्यघटनेतील कलमांचा अर्थलावणे, नागरिकांच्या अधिकाराचे रक्षण करणे. आणि केंद्र आणि राज्यशासनाच्या कार्याची जाणीव करुन देणे इत्यादी कार्य न्यायालयाने केली आहेत.

**न्यायालयीन सक्रियतेची व्याख्या :**

1. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ यांना राज्यघटनेने दिलेली कार्य व्यवस्थितरित्या पार पाडीत नसतील व त्यामुळे लोकशाही शासन, प्रशासन ,राजकारण याला धोका निर्माण होत असेल तर न्यायमंडळ आपण होऊन सक्रिय होऊन कायदेमंडळ व कार्यकारी मंडळास आपल्या जबाबदारीची जाणीव करून देते . यासर्व न्यायालयाच्या प्रक्रियेस 'न्यायालयीन सक्रियता' म्हणतात.

2. कायदेमंडळ वकार्यकारी मंडळ यांच्याकडून होणाऱ्या पण न झालेल्या कामाची अपेक्षा जनता न्यायालयाकडून करते व न्यायालय याबाबत पुढाकार घेऊन जनतेच्या अपेक्षा पूर्ण करते .व त्याकरण्यासाठी कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ यांना निर्देश देते. त्या न्यायालयाच्या प्रक्रियेस' न्यायिक क्रियाशीलता' म्हणतात.

**न्यायालयीनसक्रियतेचीकारणे :**

1. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ संविधानानुसार कार्य करत नसेलतर,
2. नागरिकांच्या मुलभूत अधिकाराच्या संरक्षणासाठी.
3. संसदेच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी.


PRINCIPAL
Shivaraj College of Arts,Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)

4. संविधानाच्या कलमांचा अर्थ लावण्यासाठी.

5. संविधानाचे संरक्षण करण्यासाठी इत्यादी, कारणामुळे न्यायालयाची सक्रियता वाढलेले दिसून येते.

न्यायालयीन सक्रियता ही संकल्पना सर्वप्रथम संयुक्तराष्ट्र अमेरिकामध्ये उदयास आली.' न्यायालयीन सक्रियता' हा शब्द सर्व प्रथम अमेरिकन इतिहासकार आर्थर ज्युनिअर यांनी उच्चारला होता. भारतामध्ये 'न्यायालयीन सक्रियता' ही संकल्पना 1970 च्या दशकात उदयाला आली. भारतातील या न्यायालयीन सक्रियतामध्ये न्यायमूर्ती वी. आर. कृष्णअय्यर , न्यायमूर्ती पि. एनभगवती, न्यायमूर्ती चीनाप्पारेडी आणि न्यायमूर्ती वेडीदेसाई यांचे योगदान महत्त्व पूर्ण आहे.

**न्यायालयीन सक्रियतेचे योगदान :**

भारतातील न्यायालयीन सक्रियतामुळे भारतीय राज्यघटनेची मूलभूत चौकट, स्वातंत्र्य, समता ,न्याय बंधुता या मुल्यांची स्थापना करण्यामध्ये मदत झाली आहे .सर्वांसाठी न्याय उपलब्ध व्हावा, म्हणून न्यायालयीन सक्रियता म्हणजे' जनहित याचिका' चे महत्व अनन्यसाधारण आहे .1950 नंतर ते आजपर्यंत वेगवेगळ्या खटल्यांच्या माध्यमातून राज्यघटनेची मूलभूत चौकट स्पष्ट करण्यामध्ये आणि संसदेच्या अधिकारावर मर्यादा ठेवण्यात न्यायालयीन सक्रियतेनेचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. सर्वसाधारण यामध्ये 1950 चा गोपालन विरोध मद्रास राज्यखटला, 1970 चाकेशवानंद भारती खटला, 1980 चा मिनर्वामिल खटला आणि 1990 विशाखा खटला यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे.

1960 च्या दशकात भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती किंवा सुधारणा करता येतील किंवा नाही हा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य खटल्यात असे स्पष्ट केले की' मूलभूत अधिकार भारतीय संविधानाने भारतातील सर्व नागरिकांना दिलेला अधिकार आहे, त्यावर कोणत्याही कारणास्तव गदा येता कामा नये. आणि भारतीय नागरिकांच्या अधिकारावर नियंत्रण आणण्याचे अधिकार संसदेला नाहीत.' असा महत्वपूर्ण निकाल देऊन नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण केले आहे. तसेच या खटल्यामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकन हे लेखीसंविधानाचे आवश्यक अंग आहे, असे न्यायमूर्ती कटिया यांनी प्रतिपादन केले होते. या खटल्याने नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण केले आहे. या खटल्याच्या निकालाद्वारे न्यायालयाने असे स्पष्ट केले की कायद्याद्वारे स्थापित केलेली कार्यपद्धती अवास्तव नसावी, मनमानीपासून मुक्त व न्याय, वाजवी असावी असा महत्वपूर्ण निकाल दिला.

सन 1970 मध्ये केशवानंद भारती खटलायां नावाची इतिहासात कायमची नोंद झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य' या प्रकरणात एक ऐतिहासिक निकाल दिला. 'संविधानाच्या प्रस्तावनेची मूलभूत संरचना संसदेला बदलता येणार नाही' असा हा निर्णय होता. या निर्णयामुळे न्यायालयाला संविधानाचे रक्षक म्हटले जाऊ लागले. हा खटला जरी मठाच्या जमिनी संदर्भात असलातरी या खटल्यामुळे कायद्यात सुधारणा करण्याच्या संसदेच्या अधिकारांना मर्यादित करणारे महत्त्वाची' घटनात्मक संरचना' तयार झाली. संविधानात दुरुस्ती करण्याचा

अधिकार संसदेला आहे, पण संविधानाच्या प्रस्तावनेची मूलभूत रचना बदलता येणार नाही. आणि कोणतीही दुरुस्ती प्रस्तावनेच्या मूळसंरचना विरोधात असू शकत नाही. असा निकाल दिला. त्यामुळे या प्रकरणात संविधानाला सर्वोच्चपदी ठेवण्यात आल्यामुळे न्यायालयीन समीक्षा, धर्मनिरपेक्षता, स्वतंत्रनिवडणूक व्यवस्था, आणि लोकशाही ही संविधानाची मूलभूत संरचना आहे .आणि या खटल्याच्या निकालामुळे भारतीय संविधानाची मूलभूत चौकट स्पष्ट झाली.

त्यानंतर नोकरदार महिलांवर त्यांच्या कामाच्या ठिकाणी किंवा त्यांच्या कामाच्या संदर्भात होणार्या मानसिक व शारीरिक छळवणुकीबाबत प्रश्न उपस्थित झाला. कार्यरत महिलांच्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणी व्हावीव त्यांचे संरक्षण व्हावे म्हणून विशाखा व इतर महिला गटांनी एकजन हितयाचिका दाखल केली होती. त्या याचिकेत निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने नोकरदार महिलांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व्हायलाच पाहिजे. असा महत्त्वपूर्ण निकाल देत कामाच्या ठिकाणी महिलांना होणाऱ्या शारीरिक व मानसिक लैंगिक छळाची व्याख्या दिली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारच्या छळास महिलांनी कसे सामोरे जावे, याची मार्गदर्शक तत्त्वे देखील घालून दिली. ती मार्गदर्शक तत्त्वे विशाखा मार्गदर्शक तत्त्वे म्हणून ओळखली जातात. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे प्रत्येक कामाच्या ठिकाणी जेथे जेथे बहुसंख्य महिला वर्ग कार्यरत आहे. तेथे ही मार्गदर्शक तत्त्वे प्रत्येकाच्या निदर्शनास येतील. असे लावण्याचे व त्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी विशाखासमिती गठित करण्याचे बंधन घातले गेले.

घटनेच्या कलम २१मध्ये राईट टू लाईफ जीवनाचा अधिकार दिलेला आहे. कलम२१ मधील जीवनाच्या अधिकारांतर्गत मृत्यूच्या अधिकारांचा देखील समावेश होतो, किंवा कसे, याबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला होता. मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारविरुद्ध मारुती श्रीपती दुगलश्या खटल्यामध्ये जगण्याच्या अधिकारात मृत्यूचा अधिकारदेखील समाविष्टआहे. असे म्हटले होते. त्याच प्रमाणे अर्पण रथिनम विरुद्ध भारतीय संघराज्य या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने जगण्याच्या अधिकारात मृत्यूचा अधिकार देखील समाविष्ट असल्याचे नमूद करत, भारतीय दंडसंहितेतील कलम३०९ श् असंविधानिक असल्याचे नमूद केले. शेवटी हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयातील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठां पुढे म्हणजेच घटनापीठाकडे वर्ग झाला. पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने मात्र जीवन व मृत्यू हे परस्पर विरोधी असल्याने घटनेच्या कलम२१ मध्ये दिलेल्या जीवनाच्या अधिकारामध्ये मृत्यूचा अधिकार समाविष्ट होऊ शकत नाही. असे मत दिले. जीवनाच्या अधिकारात सन्मानाने जगण्याचा अधिकार समाविष्ट होऊ शकतो. परंतु मरण्याचा अधिकार समाविष्ट होऊ शकत नाही असे मत खंडपीठाने व्यक्त केले.

सन 2017 मध्ये रामरहीम आणि सीबीआय या खटल्यात जगण्याचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार देण्याचा संविधानातील अनुच्छेद 21 मध्ये खाजगीपणाचा समावेश होतो. असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने देऊन समाजातील कोणत्याही व्यक्तीवर धर्माच्या, लिंगाच्या, पंथाच्या

आधारे आणि त्याच्या वैयक्तिक बाबीवर गदा येणार नाही .याची काळजी घेतली आहे. त्यामुळे कलम 21 नुसार जीविताचे व व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण याला कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास धोका उत्पन्न होणार नाही. व्यक्तीचे स्वातंत्र्य

हिरावून घेतले जाणार नाही. असा स्पष्ट निकाल देऊन सर्वोच्च न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या कलम 21 चे महत्त्व अधोरेखित केले आहे.

त्याचप्रकारे भारतीय दंड विधान कलम ४९७ मध्ये स्त्री व पुरुष यांना गुन्हेगार म्हणून वेगवेगळे मापदंड लावलेले होते. पुरुषांच्या विरोधात भेदभाव करणार्यार कायदेशीर तरतुदीला आव्हान देणार्या याचिकेत म्हणजेच श्जोसेफशाईन विरुद्ध भारतीय संघराज्य या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की दोन प्रौढव्यक्तींमध्ये एकमेकांच्या संमतीने लैंगिक संबंध होत असतील. तर केवळ स्त्रीला वगळून पुरुषाला दोषी धरणे म्हणजे भारतीय संविधानातील कलम १४ चे भंग करणे आहे. म्हणजे जेथे जेथे प्रचलित कायदे व त्यातील तरतुदी भारतीय संविधातील तरतुदींच्या विरुद्ध जात असतील व त्यामुळे भारतीय संविधानात दिलेल्या अधिकारांची पायमल्ली होत असेलतर त्यावेळी संविधानातील तरतुदींचा ऊहापोह करू न त्यांचे संरक्षण भारतीय नागरिकांना कसे मिळेल याचाच विचार न्यायालयाने केलेला दिसतो.

त्यानंतर अगदी परवा पर्यंत मुस्लीम स्त्रियांवरील तिहेरी तलाकश्द्वारे होणारा अन्याय व त्यामुळे त्यांना होणारा मानसिक शारीरिक व सामाजिक त्रास ,याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने ऊहापोह करताना मुस्लीम समाजात तिहेरी तलाक ही अति आवश्यक धार्मिक बाब आहे का, कीती आवश्यक धार्मिक बाब नाही. याबाबत घटनापीठातील न्यायाधीशांमध्ये एकमत होऊ शकले नाही व तो निकाल दोन विरुद्ध तीन या मताधिक्क्याने दिला गेला. ;सायराबानो विरुद्ध भारतीय संघराज्य याबाबत सरते शेवटी केंद्रसरकारने तिहेरी तलाक बेकायदेशीर असल्याबद्दलचा कायदा पारित केला, शबरीमलामं दिरातील महिलांचे प्रवेशावरील बंधनाबाबतही सर्वोच्च न्यायालयांने हा नियम भारतीय संविधानातील तरतुदींचा भंग करणारा असून व पुरुषांमध्ये लिंगाच्या आधारावर भेदभाव करणारा असल्याचे मत दिले.

सध्या कोरोनाबाबतच्या केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणाबाबत न्यायालयाने अतिशय सक्रिय भूमिका घेतलेली आहे. कारण न्यायालयीन सक्रियता हे समाजाच्या अस्वस्थतेचे, वेदनाचे आणि असहयातेचे प्रतिबिंब आहे .गेल्या काही दिवसाच्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशाकडे नजर टाकली तर कोरोनातील जीवरक्षक औषधाच्या किमती,औषधांची पेटंट, लसीकरणाचा कार्यक्रम, प्राणवायूचा पुरवठा आणि कोरोना रोखण्यास संदर्भातील योजना आणि धोरण हे सर्व विषय सर्वोच्च न्यायालयाने हाताळले आहेत. वरील प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून लक्ष घालून सुनावणी केली आहे. आणि वैद्यकीय वापरासाठीचा ऑक्सिजन, औषधपुरवठा ,तसेच लसीकरण या विषयावर धोरण ठरविण्याचे निर्देश दिले आहेत.33 करुणाच्या लढाईत व्यापक धोरण ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकार व आक्षेप घेतला , राज्यघटनेच्या कलम 14 आणि 21 व्या कलमानी नागरिकांना आरोग्याचा मूलभूत हक्क प्रदान केला आहे, त्याहक्कांना अनुसरून तुम्ही लसीकरणाचे धोरण ठरवले आहे काय, असा मूलभूत प्रश्न खंडपीठाने विचारला होता. अशा प्रकारे 33तोरणाच्या काळात न्यायालयाने घटनेच्या 14 व 21 या कलमात भारतीय नागरिकांना उत्तम आरोग्याचा हक्क आहे व त्याचे रक्षण करणं हे सरकारचे कर्तव्य असल्याचे निदर्शनास आणले.

**समारोप :**

न्यायालयीन सक्रियतामुळे भारतीय राज्यघटनेची मूलभूत चौकट, स्वातंत्र्य, समता, न्यायबंधुता या मूल्यांची स्थापना करण्यामध्ये मदत झाली आहे. सर्वांसाठी न्याय उपलब्ध व्हावा म्हणून न्यायालयीन सक्रियता म्हणजेच जनहित याचिकेचे महत्त्व अनन्य साधारण आहे. 1980 नंतर भारतीय राजकारणामध्ये अनेक महत्त्वपूर्ण परिवर्तन झाल्याचे दिसून येते, उदाहरणार्थ केंद्रातील आघाडी सरकारे,प्रादेशिक पक्षांचा उदय, भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, यामुळे संसदेच्या सत्तेचा दुबळेपणा स्पष्ट झाला .लोककल्याण व सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत शासन दुर्बल होत आहे, अशा वेळी दुर्बल आणि गरीब जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन दारिद्र्य, भ्रष्टाचार, दलितांचे हक्क ,सार्वजनिकसेवा ,आरोग्य पर्यावरण , योजना, कामगारांचे प्रश्न आणि संविधान इत्यादींबाबत सर्वोच्च न्यायालय सक्रीय झाल्याचे दिसते .न्यायालयीन सक्रियतामुळे नागरिकांना आपले अधिकार अनुभवण्यास मोलाचे सहाय्य मिळाले आहे .प्रशासन व सरकारच्या असंवेदनशीलतेवर टीकाकरून ,जनसमूहाला दिलासा दिल्याचे पाहायला मिळते .त्याचबरोबर राज्यघटनेच्या तरतुदींना संरक्षण व शासन संस्थेला कायदेशीर उत्तरदायित्वाची जाणीव अधोरेखित होते. अशाप्रकारे न्यायालयीन सक्रियतातेचे महत्व अधोरेखित करता येते.

**संदर्भग्रंथ :**


१.डॉ . भा . ल . भोळे - भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण

२.न्या. पी बी सावंत - न्यायालयीन सक्रियता

३.न्या . पी बी . सावंत -लोकन्यायालय

४.एस .पी .साठे - जुडीसियल ॲक्टिव्हिसम इन इंडिया


***